# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०९/०५/२०२४ (गुरूवार) सकाळ

## शांततेत निवडणुक प्रक्रीया पार पाडल्यामुळे नागपूर ग्रामीण पोलीस व त्यांच्या परीवाराकरीता ''बडा खाना'' चे आयोजन

पोलीस विभागाची परंपरा आहे की, कोणताही मोठा बंदोबस्त पार पाडल्यानंतर त्यामध्ये सहभागी असलेले पोलीस विभागातील अधिकारी व अंमलदार यांच्या करीता **''बडा खाना''** चे आयोजन केले जाते. नागपूर जिल्हयातील सार्वत्रिक लोकसभा निवडणुक—२०२४ बंदोबस्त शांततेत पार पडला तसेच जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात व्हीआयपी यांच्या भेटी झाल्या त्यामध्ये पोलीस विभागाद्वारे मेहनत घेवुन कडेकोट बंदोबस्त करून त्यामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडु दिला नाही. त्यासोबतच कायदा व सुव्यस्था अबाधित ठेवली. तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी मतदान प्रक्रीयेमध्ये बुथ बंदोबस्त अत्यंत चोखपणे बजावुन मतदान प्रक्रीयेत कोणताही अडथळा निर्माण होवु न देता मतदान प्रक्रीया यशस्वीरीत्या शांततेत पार पाडली.

नागपूर ग्रामीण जिल्हयामध्ये S.S.T / F.S.T च्या मार्फत आंतराज्य व आंतरजिल्हा चेक पोस्ट स्थापित करून बॉर्डर सिल केले होते तसेच त्याद्वारे अवैध दारू, अंमली पदार्थ, शस्त्रे व इतर अवैध कृतीची तपासणी करून कार्यवाही केली. यामुळे सार्वत्रिक लोकसभा निवडणुक —२०२४ निवडणुक प्रक्रीया शांततेत पार पाडली त्याकरीता पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण येथे बुधवार दिनांक ०८/०५/२०२४ रोजी पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांच्या परीवारासाठी बडा खान्याचे आयोजन करून सर्व पोलीस अधिकारी, अंमलदार यांच्या परीवारांना नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक मा. श्री. हर्ष पोद्दार यांनी धन्यवाद दिले.

# अवैधरीत्या देशी दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपीस अटक

दिनांक ०८/०५/२०२४ रोजी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सा. यांच्या आदेशाने पोस्टे केळवद येथील मा. ठाणेदार सपोनी राकेश साखरकर सा., ग्रेड पोउपनी अमरदीप कामठे पो.स्टे केळवद पोलीस शिपाई पंकज विनोद शहारे पो.स्टे केळवद पोशी सैफुल्ल्हा अहमद असे मिळून खाजगी वाहनाने पो.स्टे परीसरात प्रोव्हीशन रेड कामी फिरत असतांना पो. स्टे हद्दीतील मौजा उमरी शीवारातील बस स्टॉप जवळ गोपनीय बातमी दाराकडून बातमी मिळाली की एक इसम हे आपली पॅशन गाडी क्र. एम एच.– ४३/के–३२४ किंमती ३०,०००/–रू यावर देशी दारूची अवैधरीत्या वाहतूक करीत आहे. अशी माहीती मिळाल्याने मौजा उमरी शिवार गावातील रस्त्याचे कडेला जाउन प्रोव्हीशन रेड कार्यवाही केली असता एक इसम पोलीसांना पाहून पळू लागला त्यास पकडून त्याचे गाडीवर असलेली पांढऱ्या रंगाच्या बोरी मध्ये झडती घेतली असता देशी दारू संत्रा भिंगरी नं ०१ च्या ९६ निपा प्रत्येकी १८० एम एल नी भरलेल्या एकूण १७२८० एम एल प्रत्येकी ७०/– रूपये प्रमाणे असा एकूण ६७२०/– रूपयेचा माल व मो.सा क्र. एम एच–४३/के ३२४ किंमती ३०,०००/–रू. असा एकूण ३६,७२०/– रू चा मुद्देमाल आरोपीचे ताब्यातून मिळून आल्याने त्याचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव नामे **प्रशांत वासुदेव वसू, वय ३४ वर्ष रा. केळवद** असे सांगीतले त्यांना सदर मुद्देमालाबाबत परवाना विचारले असता परवाना नसल्याचे सांगितल्याने सदर माल अवैधरीत्या विनापरवाना मिळून आल्याने जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. हर्ष पोद्दार पोलिस अधिक्षक सा. नागपूर ग्रामीण, मा. रमेश धूमाळ अपर पोलीस अधिक्षक सा. नागपूर ग्रामीण मा. अनिल म्हस्के सा. उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनात ग्रेड पोउपनी अमरदिप कामठे व पोशी पंकज शहारे पोशी सैफुल्हा अहमद यांनी केली असून पूढील तपास मा. ठाणेदार पोस्टे केळवद यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रेड पोउपनी अमरदिप कामठे, पोशी पंकज शहारे हे करत आहे




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर